जळगाव (प्रतिनिधी) दि. १३ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेत दि. १२ रोजी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान द्वारा पुरस्कृत आदिवासी विकास कार्यक्रमावर आधारीत एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे व्य.प. सदस्या प्रा. पवित्रा डी. पाटील, कुलसचिव डॉ. विनोद पी. पाटील आणि प्रा.किशोर एफ. पवार (संचालक, स्कूल ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेस आणि ट्रायबल अकादमी, नंदुरबार) तर अध्यक्षस्थानी पर्यावरण व भूशास्त्र संचालक प्रा. एस. एन. पाटील हे होते. कार्यक्रमाची सुरुवात धरती गीत सादर करून केली. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. योगेश जे. महाजन यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली, यावेळी डॉ. विनोद पी. पाटील यांनी आदिवासी समुदायासाठी विशेषतः विद्यापीठाने नंदुरबारसारख्या दुर्गम आणि आदिवासी बहुल क्षेत्रात शिक्षणाची गंगा पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. यामध्ये स्थानिक गरजेनुसार अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांसाठी सोयी-सुविधा आणि संशोधनावर भर देण्यात आला आहे. नंदुरबार जिल्ह्यासाठी विद्यापीठाने केलेले विविध उपक्रम यांची यथातथ्य मांडणी करून सांगितले. पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. एस. एन. पाटील यांनी आदिवासी भागांमध्ये झालेले विविध प्रकल्पांचा आढावा घेत त्यांचे महत्त्व प्रतिपादित केले. व्याख्यान सत्रात डॉ. पराग पी. मसराम सहसंचालक, जळगाव, प्रा. डॉ. सुधाकर जाधव, प्रा. स्मिता बी. देशमुख, प्रा. भूषण एल चौधरी आणि डॉ. विशाल आर. पराते यांनी आदिवासी समुदायाच्या परंपरा आणि त्यावरती संशोधनास वाव असणाऱ्या संकल्पना व युवकांना शिक्षणासोबत उद्योगात कशाप्रकारे आवड निर्माण होईल, यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.प्रज्ञा केदार, कल्याणी क्षीरसागर, डिंपल कुलकर्णी यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. आकाश ए. तडवी यांनी केले. तसेच प्रशाळेचे प्रा. एस. आर. थोरात, प्रा. एस. बी. अत्तरदे, , प्रा. वि. एम. रोकडे, डॉ. के. पी. दांडगे, आणि श्री. राजेंद्र एस. तायडे उपस्थित होते. या व्याख्यानासाठी विद्यापीठातील सर्व महाविद्यालयातील आदिवासी विद्यार्थ्यांची उपस्थिती होती, यात एकूण १२० विद्यार्थी, १० संशोधक विद्यार्थी, व ८ शिक्षक सहभागी होते.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १३ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील योगशास्त्र विभागात ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० या वेळेत स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी स्वामीजींच्या विचारांचा जागर केला. याप्रसंगी विभाग प्रमुख इंजि.राजेश पाटील आणि डॉ.लीना चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती

या कार्यक्रमाची सुरवात ओंकार प्रार्थना करून करण्यात आली. एम.ए. योगशास्त्र प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत आपला सहभाग नोंदवाला. विद्यार्थ्यांनी प्रामुख्याने स्वामीजींचा कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग आणि राजयोग या चतुसूत्रीवर आधारित आपले मत व्यक्त केले. आयोजित वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अत्यंत ओजस्वी आणि प्रभावी शब्दांत स्वामी विवेकानंदांचे विचार मांडले.

विद्यार्थ्यांनी सांगितले की, स्वामी विवेकानंदांचे जीवन अनुभव आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. अपयशाने खचून न जाता, अधिक जोमाने यशाकडे वाटचाल कशी करावी, याचे उत्तम उदाहरण म्हणजे स्वामीजींचे चरित्र होय. "उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका" हा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या विचारांतून पुन्हा एकदा अधोरेखित केला.

स्वामी विवेकानंदांचे योग विषयक विचार अत्यंत प्रभावी शब्दात विद्यार्थ्यांनी सर्वांसमोर मांडले. स्वामी विवेकानंदांनी तरुणांना केलेली आव्हाने आणि स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी प्रेरित होऊन विद्यार्थ्यांनी राष्ट्र उभारणीसाठी योगदान कसे करावे, याविषयक विचार व्यक्त केले.

योगाशास्त्र विभागाचे प्रमुख इंजि. राजेश पाटील यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंदांचे प्रेरणादायी गुण व्यक्त केले, आणि ते आपण स्वतःमध्ये उत्तमरीत्या कसे बिंबवावेत यांची उदाहरणे सांगितली. वक्तृत्व स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींमधून एम.ए.योगशास्त्र प्रथम वर्षाच्या विद्यार्थीनी स्वाती ढाके आणि राहुल जाधव यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.लिन्ता चौधरी यांनी केले, या प्रसंगी योगशास्त्राचे प्रा.गीतांजली भंगाळे, प्रा.एकनाथ नन्नवरे यांचे सहकार्य लाभले तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तुषार सोनवणे, माधवी तायडे, रत्नाकर सोनार, इ. चे सहकार्य लाभले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १३ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता